**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## रासायनिक तंत्रशास्त्र विभागाच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सेलिब्रेशन कार्यक्रम
## एकदिवसीय सेमिनारचे आयोजन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रासायनिक तंत्रशास्त्र विभागाच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झाली आहेत. रौप्य महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून विभागाच्यावतीने दिनांक ८ मार्च, २०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता विद्यापीठाच्या डॉ.के.जी. देशमुख सभागृहात सेलिब्रेशन कार्यक्रमाचे आयोजन कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे अध्यक्षतेखाली केले असून निरी, नागपूरचे माजी संचालक डॉ. सतीश वटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.जी.व्ही. पाटील, डॉ.एस.टी. देशमुख, डॉ.एस.एन. पाटील व डॉ. मोहन खेडकर यांची कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थिती लाभणार आहे.

त्यानंतर 'अ‍ॅडव्हान्सड् केमिकल टेक्नॉलॉजी फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट' विषयावर एकदिवसीय सेमिनारचे आयोजन यु.जी.सी. सॅप अंतर्गत करण्यात आले असून उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर भूषवतील. निरी, नागपूरचे माजी संचालक डॉ. सतीश वटे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून बीजभाषण करतील. राष्ट्रीय तंत्रशास्त्र संस्था, वारांगल येथील रासायनिक अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख प्रो. शिरीष सोनवणे, निरी, नागपूरचे शास्त्रज्ञ प्राचार्य डॉ. राजेश बिनीवाले, ह.व्या.प्र.मं. अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावतीचे प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे आदी वक्ते अभ्यासपूर्ण विषयांवर व्याख्यान देणार असून निरोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर राहतील.

तरी या एकदिवसीय सेमिनारला जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठाच्या रासायनिक तंत्रशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विलास सपकाळ यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०६/०३/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी